**नि. फौ. ख. क्र.८३/२०१४**

सरकार वि. सिध्देश्वर बरगडे

**नि.क्र.६१**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव– रामचंद्र निवृत्ती भाळे ,**

वय–६५ वर्षे, व्यवसाय–शेती,

रा. लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. लोहकरे, यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

घटना दि.२८/०८/२०१३ रोजी रात्री १०.०० वाजता घडली. त्यावेळी मी, माझी मुलगी व पत्नी जेवायला बसलो होतो. त्यावेळी आरोपी हे काठी, तलवार, बॅट घेवून आले. त्यांनी माझ्या मुलीला दम दिला की, विनयभंगाची केलेली केस काढून घ्या. मी तुमच्या जावयाला काल परवा मारले. ती पण केस करू नका. नाहीतर जिवे मारील. त्यानंतर आरोपी सचिन याने रॉकेलचा डबा आणला. तो माझ्या मुलीच्या अंगावर ओतला. माझी पत्नी सोडवायला गेली. त्यावेळी विक्रमने माझ्या पत्नीला बॅटने मारले व खाली पाडले. मी सोडवण्यासाठी गेलो असता मला सिध्देश्वरने तोंडावर, पाठीवर व पायावर बरछाने मारले. अजित हा घरामध्ये तलवार घेवून फिरत होता व जिवे मारतो अशी धमकी देत होता. आम्हाला बघतो म्हणून आरोपी निघून गेले. आमचे जावयाने आम्हाला दवाखान्यात नेले. त्यानंतर तीन दिवसांनी पोलीसांनी माझा जबाब घेतला. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत. मी त्यांना ओळखतो.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपींतर्फे श्री. टी. बी. देवकर, विधीज्ञ यांचेमार्फत –**

२. मी सरतपासात सांगितलेल्या घटनेशिवाय दुसरी कोणतीही घटना घडली

नाही.  आमच्या गावात टेंबीआई देवीचे मंदीर आहे. त्या मंदिरापासून आमचे राहते घर ४ कि.मी. अंतर आहे किंवा कसे मला माहिती नाही. माझे जावई हे लाखेवाडी गावापासून २ कि.मी. अंतरावर राहतात का कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरातून दळण दळण्यासाठी लाखेवाडीत यावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८/०८/२०१३ रोजी मी माझ्या पत्नीला घेवून रात्री १०.०० वाजता कारखाना चौक येथे आलो होतो.  हे म्हणणे खरे नाही की, मी व माझी पत्नी मोटारसायकलवरून खाली पडल्यामुळे आम्हाला जखमा झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, नामदेव नाईक याने मला उठवून घरी नेवून सोडले. माझ्या पत्नीवर आरोपी विक्रम याने काठी फेकून मारली म्हणून केस केली होती.  इतर आरोपीने माझ्या पत्नीच्याविरुध्द साक्ष दिली का कसे मला माहिती नाही. माझ्या मुलीने आरोपी सिध्देश्वर याचेविरुध्द विनयभंगाची केस केली होती. त्या खटल्यातून सिध्देश्वरची निर्दोष मुक्तता झाली. आमचे बारामतीचे अपील नामंजूर झाले.  गट नं.६५५/१ ची माहिती मला नाही.  गट नं.६५५/१ हा पुर्वी विठ्ठल बरकडे याचा होता व तो त्याने राजाराम भोसले यांना विक्री केला का कसे मला माहिती नाही. गट नं.६५५/१ माझ्या जावयाने खरेदी केला का कसे मला माहिती नाही. माझे जावयाने गट नं.६५५/१ पैकी उत्तर बाजूचे एक एकर क्षेत्र आरोपी अजितला विक्री केले का कसे मला माहिती नाही. माझ्या जावयाचे घर गट नं.६५५/१ मध्ये आहे का कसे मला माहिती नाही. माझ्या जावयाचे घर विक्री केलेल्या क्षेत्रात येते का कसे मला माहिती नाही. माझा जावई सध्या गट नं.६५५/१ सोडून दुसरीकडे राहण्यासाठी आहे. माझ्या जावयाने राहायची जागा का बदलली याचे कारण मला माहिती नाही.  हे म्हणणे खरे नाही की, जमिनीच्या कारणावरून माझ्या मुलीने विनयभंगाची केस आरोपींच्याविरुध्द केली होती. सन २०१२-२०१३ पासून माझे जावई व मुलगी हे चाकाटी गाव रोडवर राहतात.  कथित घटनेवेळी माझे जावई तेथे नव्हते. माझ्या मुलीचा व आरोपीचा जागेच्या कारणावरून वाद आहे का कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला माझ्या घराच्या चर्तुःसिमा सांगता येणार नाहीत. दि.२८/०८/२०१३ रोजी विनयभंगाचे केसचे कोणतेही काम इंदापूर पोलीस स्टेशनमध्ये होते का कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सचिन याने माझ्या मुलीच्या अंगावर रॉकेल ओतले हे मी खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विक्रम याने माझ्या पत्नीला बॅटने मारले हे मी खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सिध्देश्वरने मला बरछाने मारले हे मी खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की,

अजित मारहाण करत होता हे मी खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, अजित हा घरामध्ये तलवार घेवून फिरत होता व जिवे मारतो अशी धमकी देत होता हे मी खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, पहिल्या केसमधून आरोपींची निर्दोष मुक्तता झाली त्यामुळे विचारांती आरोपींच्याविरुध्द खोटी केस केली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.१४/१०/२०२४**